आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
३ सप्टेंबर २०२५ - बुधवार

**ठळक बातम्या**

जीएसटी कर परिषदेची ५६वी बैठक नवी दिल्लीत केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सुरु/ कररचनेत मोठ्या सुधारणांची शक्यता

ओबीसी समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती नेमण्याचा राज्य सरकारचा निर्णय

कारखान्यांमधले दैनंदिन कामाचे तास ९ वरून १२ पर्यंत वाढवण्यासाठी अधिनियमातल्या सुधारणांना राज्य मंत्रिमंडळाची मान्यता

छत्तीसगडमध्ये २० माओवाद्यांची शरणागती

आणि

थायलंडच्या काळजीवाहू सरकारकडून संसदेचं कनिष्ठ सभागृह बरखास्त करण्याची विनंती

**<><><><>**

जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर परिषदेची ५६वी बैठक नवी दिल्ली इथे सुरू आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन बैठकीच्या अध्यक्षस्थानी आहेत. केंद्रीय अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी तसंच अनेक राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांचे अर्थमंत्री या बैठकीत सहभागी होत आहेत.

करांचं सुसूत्रीकरण आणि कर विवरणपत्र भरण्याच्या प्रक्रियेचं सुलभीकरण, यासह नव्या जीएसटी सुधारणांबाबत या बैठकीत चर्चा अपेक्षित आहे. याबाबतची घोषणा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात केली होती. जीएसटीचे फक्त ५ टक्के आणि १८ टक्के हे दोनच स्लॅब ठेऊन, १२ आणि २८ टक्क्याचे स्लॅब काढून टाकण्याचा निर्णय या बैठकीत होण्याची शक्यता आहे.

**<><><><>**

सेमिकॉन इंडिया २०२५ परिषदेच्या दुसऱ्या दिवशी आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीमधल्या यशोभूमी इथं सेमिकंडक्टर क्षेत्रातल्या तज्ज्ञांशी संवाद साधला. सेमिकंडक्टरशी संबंधित उत्पादनं आणि प्रकल्पांचीही त्यांनी पाहणी केली. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णवही यावेळी उपस्थित होते.

**<><><><>**

संगणकीय युगात उपलब्ध झालेल्या मुबलक ज्ञानस्रोतांचा विद्यार्थ्यांनी उपयोग करुन घेतला पाहिजे,असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. तमिळनाडूत तिरुवारूर इथं सेंट्रल युनिव्हर्सिटीच्या दीक्षांत समारंभाला त्या संबोधित करत होत्या.

**<><><><>**

ओबीसी समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती नेमण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. आज सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय झाल्याचं मंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितलं. चंद्रशेखर बावनकुळे या उपसमितीचे अध्यक्ष असतील. छगन भुजबळ, गणेश नाईक, गुलाबराव पाटील, संजय राठोड, पंकजा मुंडे, अतुल सावे, दत्तात्रय भरणे यांचा यात सदस्य म्हणून समावेश आहे. इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव हे या उपसमितीचे सचिव असतील.

ओबीसींच्या कल्याणासाठी असलेल्या राज्य शासनाच्या विविध योजनांचं परीक्षण, आढावा घेणं आणि त्यासंदर्भातल्या उपाययोजना सुचवणं, तसंच ओबीसींच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि इतर संलग्न बाबींवर विचार विनीमय करणं, या उपसमितीच्या कार्यकक्षेत समाविष्ट आहे. आजच्या मंत्रिमंडळ बैठकीतल्या इतर निर्णयांविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

- **- -होल्ड व्हाइस कास्ट - - -**

*(राज्यात अनुसूचित जमातीतल्या इयत्ता नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांना सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेऐवजी केंद्र सरकारची पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना लागू करायला मंत्रिमंडळानं आजच्या बैठकीत मंजुरी दिली. केंद्राच्या शिष्यवृत्ती योजनेत लाभाची रक्कम जास्त असल्यानं सरकारनं हा निर्णय घेतला आहे. संजय गांधी निराधार योजना तसंच श्रावणबाळ योजनेतल्या दिव्यांगांच्या अर्थसहाय्यात १ हजार रुपयांची वाढ करण्यात आली. असून लाभार्थ्यांना आता दरमहा दीड हजाराऐवजी अडीच हजार रुपये मिळणार आहेत.*

*मुंबईसाठी २३८ एसी लोकल खरेदी करण्यासाठी २ हजार ४१३ कोटी रुपयांचा निधी द्यायला सरकारनं आज मंजुरी दिली. मुंबईत नागरी परिवहन प्रकल्पाच्या अंतर्गत बदलापूर - कर्जत दरम्यान तिसरी आणि चौथी रेल्वे मार्गिका, आसनगाव - कसारा दरम्यान*

*चौथी रेल्वे मार्गिका, पनवेल - वसई दरम्यान नवीन उपनगरीय रेल्वे मार्गिका यासाठीही मंत्रीमंडळानं आज मान्यता दिली. पुणे - लोणावळा दरम्यान तिसऱ्या आणि चौथ्या रेल्वे मार्गिकेलाही आज मंजुरी मिळाली.*

*मुंबईत आणिक डेपो- वडाळा ते गेटवे ऑफ इंडिया या मेट्रो मार्गिका प्रकल्पाला मंत्रिमंडळानं मान्यता दिली. त्यासाठी २३ हजार ४८७ कोटी ५१ लाख रुपयांची तरतूद केली आहे. ठाणे - नवी मुंबई विमानतळ उन्नत मार्ग, नागपूर शहराभोवती बाह्य वळण रस्ता यालाही सरकारनं मान्यता दिली. ठाणे वर्तुळाकार मेट्रो, पुण्यातल्या मेट्रो मार्गिका-२ आणि ४, तसंच नागपूर मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यासाठीच्या कर्जांनाही मंत्रिमंडळानं मान्यता दिली. पुणे मेट्रोवरच्या बालाजीनगर, बिबवेवाडी या दोन नवीन स्थानकांना मंजुरी देण्यात आली. हिंगणा तालुक्यात राज्य सरकार नवीन नागपूर वसवणार आहे. त्यात आंतरराष्ट्रीय व्यापार आणि वित्तीय केंद्र उभारायला मंत्रीमंडळानं आज परवानगी दिली. औष्णिक वीज निर्मिती केंद्रातल्या राखेच्या वापरासंबंधी केंद्र सरकारच्या धोरणाच्या आधारे तयार केलेल्या धोरणाला मंत्रीमंडळानं मान्यता दिली.*

*लंडनमधल्या महाराष्ट्र मंडळाच्या इमारतीत छत्रपती शिवाजी महाराज वैश्विक मराठी भाषा केंद्र उभारण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळानं घेतल्याची माहिती मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी दिली. महाराष्ट्रातल्या अमराठी लोकांनाही मराठी शिकवण्यासाठी app विकसित करत असल्याची माहितीही सामंत यांनी दिली.)*

**<><><><>**

राज्य मंत्रिमंडळानं कारखाने अधिनियम १९४८ च्या कलम ५४ आणि महाराष्ट्र दुकाने आणि आस्थापना अधिनियम २०१७ मध्ये सुधारणा करायला आज मंजुरी दिली. यामुळे कारखान्यातले दैनंदिन कामाचे तास ९ तासांवरून १२ तासांपर्यंत होणार आहे. तसंच विश्रांतीसाठी सुट्टीचा कालावधी ५ तासानंतर ३० मिनिटे याऐवजी ६ तासानंतर ३० मिनिटे असा करण्यात आला आहे. ओव्हरटाइमसाठी कामगारांची लेखी संमती घेणे आवश्यक असेल. मात्र ओव्हरटाइमच्या तासाची मर्यादा तिमाही ११५ तासांवरुन १४४ तास होणार आहे.

दुकानांच्या संदर्भातल्या अधिनियमातल्या सुधारणांमुळं याठिकाणचे दैनंदिन कामाचे तास ९ वरुन १० होतील. तातडीचे काम सोपविलेल्या कर्मचाऱ्यांना साडेदहा ऐवजी १२ तास काम करावे लागेल.

राज्यात गुंतवणूक आकर्षित करणे आणि रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी हे बदल करण्यात आले आहेत, असं राज्य सरकारनं म्हटलं आहे. कर्नाटक, तमिळनाडू, तेलंगणा, उत्तर प्रदेश, त्रिपुरा यासारख्या राज्यांनी हे बदल आधीच केलेले आहेत.

<><><><>

छत्तीसगडमध्ये सुकमा जिल्ह्यात आज २० माओवाद्यांनी शरणागती पत्करली. त्यांच्यावर एकूण ३३ लाख रूपयांचं बक्षिस होतं. या माओवाद्यांमध्ये नऊ महिलांचा समावेश आहे.

<><><><>

उत्तरेत पावसानं धुमाकूळ घातला असून त्याचा फटका अनेक राज्यांना बसत आहे, जम्मू काश्मीर,हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड या राज्यात ढगफुटीच्या अनेक घटना घडल्या त्यामुळे अनेक ठिकाणी पूरपरिस्थिती निर्माण झाली. पुरामुळे कित्येकांना आपले प्राण गमवावे लागले तर कितीतरी जण बेपत्ता झाले. पंजाबमध्ये सुरक्षेच्या कारणावरून धरणांचे दरवाजे उघडण्यात आले आहेत. जम्मू आणि काश्मीर मध्ये सातत्यानं मुसळधार पाऊस पडत असल्यानं रियासी जिल्ह्यातल्या सलाल धरणाचे सगळे दरवाजे उघडण्यात आले आहेत. चिनाब नदी आणि तिच्या उपनद्यांमधून येणाऱ्या पाण्याचं नियंत्रण करता यावं आणि धरणाला धोका पोहचू नये म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी परिसरात पाणी साचण्याच्या घटना वाढल्यानं जनजीवन विस्कळीत झालं आहे.

या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ जितेंद्र सिंग यांनी आज आढावा बैठक घेतली. जनतेच्या सुरक्षेसाठी हवामानाचा अंदाज फार अगोदर यावा आणि अंदाजात अचूकता येण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

<><><><>

थायलंडच्या काळजीवाहू सरकारने संसदेचं कनिष्ठ सभागृह बरखास्त करण्याची विनंती केली असून लवकरच निवडणुका जाहीर होतील अशी घोषणा काळजीवाहू प्रधानमंत्री

फुमथम वेचायचाई यांनी आज केली. याबाबतची माहिती राजा महा वजिरालोंगकोर्न यांना सादर करण्यात आली असून त्याला शाही मंजुरी मिळणं अद्याप बाकी आहे.

**<><><><>**

परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी आज जर्मनीचे परराष्ट्र मंत्री जोहान डेविड वाडेफल यांच्याशी आज नवी दिल्ली इथं चर्चा केली. भारत- जर्मनी परस्पर संबंध आणि युरोपीय संघ या विषयावर तसंच क्षेत्रीय आणि जागतिक महत्त्वाच्या मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाल्याचं जयशंकर यांनी पत्रकारपरिषदेत सांगितलं. उभय राष्ट्रातल्या राजनैतिक संबंधांना २५ वर्ष , विज्ञान विषयक सहकार्याला ५० वर्ष तर सांस्कृतिक संबंधांना ६० वर्षं पूर्ण होत आहेत. हे संबंध दृढ होत असतानाच भारताला जर्मनीकडून अंतराळ क्षेत्रात सहकार्याची अपेक्षा असल्याचं ते म्हणाले.

**//<><><><>//**